# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

## माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र.८८६/२०२१/अहमदनगर

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. सदाशिव भाऊसाहेब वंजारी<br>मु.पो.ता.वंजारगल्ली,रणसाळे बिल्डींग, सिन्नर,<br>ता.सिन्नर,जि.नाशिक | नायब तहसीलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय, शिर्डी भाग, ता.राहाता, जि.अहमदनगर | उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, शिर्डी भाग, ता.राहाता, जि.अहमदनगर |

### व्दितीय अपिल सुनावणी दिनांक -२७/१०/२०२३

| मुळ अर्ज दिनांक | मुळ अर्ज जमाअ यांना प्राप्त दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दिनांक | प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| ०६/११/२०२० | ०६/११/२०२० | १८/१२/२०२० | १८/१२/२०२० | १८/१२/२०२० | १४/०१/२०२१ |

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

अपिलार्थी यांनी दि. २७/०१/२०२१ रोजीच्या अर्जान्वये "माहिती अधिकार अर्जाप्रमाणे माहिती मिळालेली नाही" असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिल अर्जात त्यांनी खालील प्रमाणे विनंती केलेली आहे.

- माहिती अधिकार अर्जानुसार माहिती देण्यात यावी.

२. सदर व्दितीय अपिलाच्या सुनावणीस अपिलार्थी व तत्कालीन जन माहिती अधिकारी व तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

३. अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

आपले निकालपत्र RTS अपील नं १३५/२०१९, दि.१६/०३/२०२० चे संदर्भात अशी माहिती मागविण्यात येते की, मृत्युपत्राच्या संदर्भात केस चालविणे, मृत्युपत्राच्या सहाय्याने झालेल्या नोंदी रद्द करणे, मृत्युपत्रावर आक्षेप घेऊन रद्दबातल ठरविणे किंवा खोटे ठरविणे इ. दिवाणी न्यायालयाचे अधिकार आपणास कोणत्या सरकारी कायद्यात दिले आहे. मृत्यूपत्रावर घेतलेले आक्षेप सिद्ध करणारे पुराव्यांच्या झेरोक्स प्रती मिळणे. याबाबत सविस्तर माहिती.

४. तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये "माहिती प्राप्त झालेली नाही" असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

५. या प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेले कागदोपत्री पुरावे आणि युक्तिवादावरुन असे दिसून येते की,

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि.२७/१०/२०२३ अन्वये आयोगासमोर अहवाल सादर केलेला असून त्यात माहिती अधिकार अर्जावर दि.१८/१२/२०२० रोजीच्या पत्रान्वये सविस्तर खुलासा व उत्तर अर्जदारास कळविण्यात आलेले आहे.

२) तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१४/०१/२०२१ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केलेला असून अपिलार्थी यांचे अपील फेटाळले आहे.

३) माहिती अर्ज १५० शब्दात नसल्याने महाराष्ट्र माहितीचा अधिनियम नियम २००५ मधील नियम ३(ख) मधील तरतुदीचा भंग करणारा आहे. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कार्यवाही केलेली आहे.

सबब, या प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

वरील आदेशासह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

**जावक क्र.** आ-१७८३ 28 JUN 2024